# पंचायत समिती डहाणू
## ग्रामपंचायत विभाग

दुरध्वनी ०२५२८ - २२२३८७ ई मेल :-bdodahanu@gmail.com

कार्यालयाचा पत्ता - आगर रोड, पारनाका, पो. ता. डहाणू, पिन ४०१६०१ जि.पालघर, महाराष्ट्र राज्य.

जा.क्र.पंसड/ ग्रापं/यो-१/वशि/ २७७ /२०२५-२६ दिनांक :- १५.१०.२०२५

**प्रति,**

**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत-सर्व ता. डहाणू जि. पालघर.**

**विषय**:- उसाट गुरांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या गुरांचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याबाबत.

**संदर्भ** :- मा. सहाय्यक जिल्हाधिकारी, डहाणू विभाग डहाणू यांचेकडील दि.१३.१०.२०२५रोजीच्या सभेतील इतिवृत्तानुसार कार्यवाही करणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा. सहाय्यक अधिकारी, डहाणू विभाग डहाणू यांच्या कार्यालयात दिनांक १३.१०.२०२५ रोजी मोकाट गुरांच्या बंदोबस्ताबाबत तालुक्यातील संबंधित खातेप्रमुखांची सभा घेण्यात आली असून सदर सभेमध्ये डहाणू व तलासरी तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दीत उसाट गुरांमुळे शेतक-यांचे नुकसान करणाऱ्या गुरांचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने डहाणू तालुक्यातील ज्या ग्रामपंचायत हद्दीत उसाट गुरांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या गुरांचा बंदोबस्त करण्यासाठी ठिकाणी उसाट गुरे आढळून येतील अशा ग्रामपंचायतीने गावातील सार्वजनिक ठिकाणी फ्लॅक्स लावण्यात येऊन दवंडी देण्यात यावी व ज्यांची गुरे आहेत त्यांनी आपली गुरे घेऊन जावे अन्यथा गुन्हा दाखल करून दंडनीय रक्कम वसुल करणेबाबत संबंधित मालकांना ग्रामपंचायतस्तरावरून लेखी कळविण्यात यावे.

पशु संवर्धन विभागाकडून ज्या गुरांवर टॅग लावला आहेत ती गुरे वेगळी करून त्या गुरांच्या मालकांची माहिती घेऊन उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे निदर्शनास आणून सदर मालकां विरुध्द संबंधित पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात यावा व गुरांच्या मालकांकडून दंडात्मक रक्कम वसुल करण्यात यावी. तसेच तालुक्यातील गो-शाळेशी संपर्क करून सदर मोकाट गुरे त्या ठिकाणी पाठविण्याची व्यवस्था करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल फोटोसह या कार्यालयास सादर करावा.

**(पल्लवी सस्ते)**
**गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती डहाणू.**

**प्रत-** मा.सहाय्यक जिल्हाधिकारी डहाणू विभाग, डहाणू यांना माहितीस्तव सादर.